# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र

## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२६/M/०००००७८**

**अपिलार्थी श्री. कैलास आव्हाड**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (कार्या-६)**
सामान्य प्रशासन विभाग, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा अवर सचिव**
सामान्य प्रशासन विभाग, १९ वा मजला, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १२.१०.२०२६**

अपीलकर्ता : अनुपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २४.१०.२०२५ | ०४.११.२०२५ | २१.११.२०२५ | १०.१२.२०२५ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ०९.०१.२०२६ रोजीच्या अर्जान्वये प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश मान्य नाहीत असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि.१०.१२.२०२५ संलग्न केले आहेत.

२. अपिलार्थी यांनी दि. २४.१०.२०२५ रोजीच्या माहिती अर्जानुसार शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०१२/९८९/प्र.क्र.४७९/सहा, मंत्रालय मुंबई दि. १७.१०.२०१४ रोजी परिपत्रक शासनाच्या अधिकाऱ्यांनी परिपत्रक प्रसिद्ध केले. सर्व अधिकाऱ्यांचे संपूर्ण नाव, हुद्दा, नेमणूक आदेश अधिकारीनी परिपत्रक काढण्यासाठी काही मोजक्या ओळी नमूद केलेल्या आहे. संपूर्ण मराठीत निर्णय रिट पिटीशन क्र. २७७३४/२०१२ गिरीश रामचंद्र देशपांडे विरूद्ध केंद्रिय माहिती आयोग दि. ०३.१०.२०१२ सर्वोच्च न्यायालयाने सर्व प्रकरणात लागु होईल असे नमूद केले बाबत सर्व मराठीभाषेत माहिती मिळणेबाबत मागणी केली आहे.

३. जन माहिती अधिकारी यांनी उत्तर न दिल्याने अपिलार्थीनी दि. २१.११.२०२५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. १०.१२.२०२५ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीना शुल्क भरण्यास कळविलेले आहे व अपिलार्थीनी शुल्क भरल्यास माहिती उपलब्ध करुन द्यावी असे नमुद करुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

..२/-

४. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, अपिलार्थींचा माहिती अर्ज स्पष्ट नव्हता. तरीही अपिलार्थींना माहिती मिळावी म्हणून शासन परिपत्रक दि. १७.१०.२०२४ शी संबंधीत संपूर्ण नस्तीची प्रत उपलब्ध करुन देण्याची तयार दर्शवली व टिप्पणी विभाग तसेच पत्रव्यवहार विभागाचे एकुण २०५ पाने असल्याने अपिलार्थींना एकुण टपाल खर्चासह रु. ४५६/- माहिती शुल्क भरण्यास दि.०४.११.२०२५ रोजी कळविले. प्रथम अपिलीय अधिकारी यांच्यासमोर झालेली सुनावणी दरम्यान अपिलार्थींनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. ०४.११.२०२५ प्राप्त न झाल्याचे नमुद केले व जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेसमोर सदर पत्राची प्रत अपिलार्थींना उपलब्ध करुन दिली असता अपिलार्थींनी ती स्विकारण्यास नकार दिला.

५. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना लेखी कळवून एक ठराविक दिवशी शासन परिपत्रक दि.१७.१०.२०१४ ची संबंधीत नस्ती अपिलार्थींना निरीक्षणाकरीता उपलब्ध करुन देऊन अपिलार्थींना त्यापैकी हवी असलेली माहिती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ७(६) अन्वये निशुल्क उपलब्ध करुन द्यावी.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**१) जन माहिती अधिकारी यांनी वरील विवेचनानुसार कार्यवाही करावी.**

**२) अपील निकाली काढण्यात येत आहे.**

प्रदीप व्यास 13-10-2026

**मुंबई**
**दिनांक : १३.१०.२०२६**

State Information Commission
Greater Mumbai
सत्यमेव जयते

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई